## मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

दत्ता पांडूरंग बचाटे व इतर .... वादी

विरुध्द

जिल्हाधिकारी व इतर ....प्रतिवादी

## तात्पुरता मनाई अर्ज नि.क्र.०५ खालील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन प्रतिवादी क्र.३ तहसीलदार मेहकर यांनी दिनांक ०१.११.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. ४ तलाठी बोरी व प्रतिवादी क्र.५ मंडळ अधिकारी अंजनी बु. यांना पाठवून दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ३ ते ५, ८ व ९ यांनी वादींच्या मालकीचे गटक्रमांक १९५ मध्ये खोदकाम करु नये किंवा वादींच्या कब्जे वहिवाटीस अडथळा करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले नाही.

०३. प्रतिवादी क्र. ८ व ९ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. ५५ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे.

०४. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ..नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

०५. वादींनी प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल करुन खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत–

१. प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी मामलतदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ अनुसार वादी यांच्या विरुध्द दाखल केलेले वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट/५/ बोरी/२२/२०१७–१८ मधील दिनांक २६.०८.२०१९ रोजीचे निकालाची प्रत,
२. वादींनी उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या न्यायालयात दाखल केलेले रिव्हीजन क्रमांक एम.सी.ए.ॲक्ट–५/बोरी ८/२०१८–१९ मधील दिनांक २५.०३.२०२१ रोजीच्या निकालाची प्रत,
३. प्रतिवादी क्र. ९ संतोष धोंडू चनखोरे यांनी तहसीलदार मेहकर यांच्याकडे दिनांक ०८.१२.२०२१ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत,
४. दिनांक २०.०६.२०२२ रोजी तलाठी बोरी यांनी केलेला पंचनामा व प्रतिवेदनाच्या प्रती,
५. उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १०.०८.२०२२ रोजी तहसीलदार मेहकर यांना पाठवून दिलेल्या पत्राची प्रत,
६. दिनांक ३०.०८.२०२२ रोजी तहसीलदार मेहकर यांनी उपविभागीय

अधिकारी मेहकर यांना पंचनाम्यासह सादर केलेल्या अहवालाची प्रत,

७. उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार यांच्या अहवालाच्या अनुषंगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत,
८. तहसीलदार मेहकर यांनी दिनांक ०१.११.२०२२ रोजी मंडळ अधिकारी व तलाठी यांना पाठवून दिलेले निर्देश वजा पत्राची प्रत,
९. तहसीलदार मेहकर यांनी दिनांक ०१.११.२०२२ रोजी पोलिस निरीक्षक पोलिस ठाणे मेहकर यांना दिलेल्या पत्राची प्रत,
१०. प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या नावे असलेले ७/१२ उता–याच्या प्रती,
११. वादग्रस्त जमिनीच्या लगत असलेल्या साक्षीदारांच्या शपथपत्राच्या प्रती,

०६. प्रतिवादी क्र. ८ व ९ यांनी त्यांच्या लेखी कथनाच्या पृष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत.

१. वादग्रस्त जमिनीच्या लगत असलेले कास्तकारांच्या शपथपत्राच्या प्रती,
२. वामनराव दगडू चनखोरे व इतर यांनी मामलतदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ अनुसार वादी यांच्या विरुध्द दाखल केलेले वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/२३/२०१७–१८ मधील दिनांक २०.०५.२०२० रोजी झालेल्या निकालाची प्रत,
३. दिनांक १८.११.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत,

०७. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तवाद ऐकण्यात आला. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने हरचरणजीत सिंग –विरुध्द–दिक्षा २००८ (३) एम.एल.जे. मा. उच्च न्यायालय मुंबई, पणजी खंडपीठ यांचा न्यायनिवाडा सादर केला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>–**

०८. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत

करण्यात येत आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेकामी वादींनी प्रथमदर्शनी पुरावा व खरी परिस्थिती न्यायालयासमोर सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मौजे बोरी ता. मेहकर येथील गटक्रमांक १९५ मध्ये ०२ एकर ०२ आर शेतजमीन वादींच्या मालकी कब्जे वहिवाटीची आहे. तसेच प्रतिवादी क्र. ६ व ७ यांच्या कुटुंबाच्या मालकीची जमीन गटक्रमांक १९५ मध्ये ०१ हेक्टर ८२ आर असून प्रतिवादी क्र. ८ व ९ यांच्या मालकीच्या जमीनी गटक्रमांक १६५ मध्ये अनुक्रमे ५५ आर व ५८ आर आहे. वादी व प्रतिवादींनी त्यांच्या ताब्यातील जमिनीच्या मालकीबाबत वाद उपस्थित केलेला नाही.

०९. पुढे संचिकेत दाखल कागदपत्रावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी वादी विरुध्द मामलतदार कोर्ट ॲक्ट चे कलम ५ अनुसार बंद करण्यात आलेला वहिवाटी रस्ता खुला होवून मिळण्याकरिता तसा वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट –५/बोरी /२२/२०१७–१८ दाखल केला होता. सदर वहिवाट दाव्यात उभयपक्षांचा साक्षीपुरावा नोंदवून स्थळ पाहणी करुन संबंधीत मामलतदार कोर्टाने दिनांक २६.०८.२०१९ रोजी वहिवाट दावा मंजूर केला. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, वर नमूद वहिवाट दाव्यातील निकालाच्या विरुध्द वादींनी उपविभागीय अधिकारी मेहकर यांच्या न्यायालयात रिव्हीजन क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/८/२०१८–१९ दाखल केला. वर नमूद रिव्हीजन प्रलंबीत असतांना वादी व प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी आपसात तडजोड करुन मामलतदार कोर्टाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे वादी हा गटक्रमांक १९५ मधून जाणा–या वहिवाटी रस्त्यातील ०३ फुट रुंदीच्या नाल्यात स्वखर्चाने दगड माती भरुन बैलगाडी रस्ता पूर्ववत करुन घेण्याचे मान्य केले. वरीलप्रमाणे झालेल्या

तडजोडीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक २६.०८.२०१९ रोजी मामलतदार कोर्टाने पारित केलेला आदेश कायम ठेवून रिव्हीजन नामंजूर केले. पुढे संचिकेत दाखल कागदपत्रावरुन असे दिसून येते की, वामनराव चनखोरे, प्रकाश बचाटे व भगवान बचाटे यांनी वादी यांच्या विरुध्द मामलतदार कोर्ट ॲक्ट चे कलम ५ अनुसार वहिवाटी रस्ता खुला होवून मिळण्याकरिता तसा वहिवाटी दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी /२३/२०१७–१८ दाखल केला होता. सदरचा वहिवाटी दावा चौकशी अंती दिनांक २०.०५.२०२० रोजी मंजूर करण्यात आला.

१०. प्रस्तुतचा दावा वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी / २२/२०१७–१८ मधील दिनांक २६.०८.२०१९ व रिव्हीजन क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/८/२०१८–१९ मधील दिनांक २५.०३.२०२१ रोजी पारित झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने तहसीलदार मेहकर यांनी केलेल्या कारवाई संदर्भात दाखल करण्यात आला आहे. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास येते की दिनांक २६.०८.२०१९ रोजी मामलतदार कोर्टाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी होवून मिळण्याकरिता प्रतिवादी क्र.९ यांनी दिनांक ०८.१२.२०२१ रोजी तहसीलदार मेहकर यांच्याकडे तसा अर्ज दिलेला आहे. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास येते की प्रतिवादी क्र.९ यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तहसीलदार मेहकर यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत मोका पाहणी करुन घेवून तसा पंचनामा करुन घेतला. सदर पंचनाम्याच्या आधारे तलाठी बोरी यांनी तहसीलदार मेहकर यांना दिनांक २१.०६.२०२२ रोजी प्रतिवेदन सादर केले आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की सदर पंचनामा व प्रतिवेदनाच्या आधारे तहसीलदार मेहकर यांनी मामलतदार कोर्टाने दिनांक २६.०८.२०१९ रोजी पारित केलेला आदेश व उपविभागीय अधिकारी यांनी रिव्हीजन मधील दिनांक

२५.०३.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे कामी मंडळ अधिकारी अंजनी बु. व तलाठी बोरी यांना दिनांक ०१.११.२०२२ रोजी निर्देश / पत्र पाठवून दिले. पुढे असेही दिसून येते की, आदेशाची अंमलबजावणी करते वेळेस वादींनी अडथळा निर्माण केल्यास त्याच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची सूचना तहसीलदार मेहकर यांनी दिलेली आहे.

११. वादींच्या विधीज्ञांनी असा युक्तवाद केला की, रिव्हीजन क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/८/२०१८–१९ मध्ये वादी व प्रतिवादी क्रमांक ६ व ७ यांच्यात तडजोड झालेली होती आणि त्या तडजोडीच्या अनुषंगाने वादींनी मामलतदार कोर्टाने दिनांक २६.०८.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाची पूर्तता केलेली आहे. पुढे वादीच्या विधीज्ञांनी न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, दिनांक २६.०८.२०१९ रोजी पारित झालेला आदेश प्रतिवादी क्र. ९ च्या बाजूने नसतांना देखील त्याने सदर आदेशाच्या अंमलबजावणीसाठी खोटया मजकुराचा अर्ज तहसीलदार मेहकर यांच्याकडे दिलेला आहे. पुढे न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणून दिले की दिनांक २६.०८.२०१९ रोजीचा आदेश नायब तहसीलदार मेहकर यांनी पारित केलेला असल्यामुळे त्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार फक्त संबंधीत नायब तहसीलदार मेहकर यांना प्राप्त आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की दिनांक २६.०८.२०१९ रोजी पारित झालेल्या आदेशाप्रमाणे वादीने स्वखर्चाने वहिवाटी रस्त्यात खोदलेली नाली दगड व माती टाकून भरुन तो वहिवाटी रस्ता पूर्ववत करुन दिलेला आहे आणि सदरची वस्तुस्थिती प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी त्यांच्या लेखी कैफियतमध्ये मान्य केली आहे. पुढे वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असतांना तहसीलदार मेहकर यांनी राजकीय दबावापोटी दिनांक ०१.११.२०२२ रोजीच्या पत्राच्या

अनुषंगाने वादींच्या मालकीच्या गटक्रमांक १९५ मध्ये जेसीबी द्वारे खोदकाम करुन पावसाच्या पाण्याचा प्रवाह वादीच्या शेतात वळविले आहे त्यामुळे वादींचे शेतातील पिकाचे नुकसान होवून वादींचे आर्थिक नुकसान झाले आहे.

१२. प्रतिवादी क्र. ८ व ९ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत अर्जासंदर्भात वादींनी खरी परिस्थिती न्यायालयापासून लपवलेली आहे. पुढे प्रतिवादीचे विधीज्ञांनी न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, गटक्रमांक १९५ च्या लगत असलेले जमीनधारक वामनराव चनखोरे, प्रकाश बचाटे, भगवान बचाटे यांनी वादी यांच्या विरुध्द वहिवाटी रस्ता खुला होवून मिळण्याकरिता वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/२३/२०१७–१८ दाखल केला होता आणि सदरचा वहिवाट दावा दिनांक २०.०५.२०२० रोजी मंजूर करण्यात आला. पुढे प्रतिवादीच्या विधीज्ञांनी न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की वर नमूद वहिवाट दाव्या संदर्भात वादींनी वादपत्रात किंवा प्रस्तुत अर्ज नि.क्र.०५ मध्ये उल्लेख केलेला नाही. पुढे प्रतिवादीच्या विधीज्ञांनी न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १८.११.२०२२ रोजी तहसीलदार मेहकर यांनी सादर केलेल्या अहवाल व पंचनाम्याच्या आधारे आदेश पारित केला आणि दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या स्थळ निरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने तात्काळ शेतरस्ता खुला करणेबाबत तसेच पाण्याचा / नाल्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याबाबत पुढील कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार मेहकर यांना दिले आहे. पुढे प्रतिवादीचे विधीज्ञांनी न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणून दिले की उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १८.११.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाबाबत वादींनी त्यांच्या वादपत्रात किंवा अर्ज नि.क्र. ०५ मध्ये उल्लेख केलेला नाही. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, दिनांक

१८.११.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे तहसीलदार मेहकर यांनी अंमलबजावणीची पुढील कारवाई केलेली असून ती योग्य आहे.

१३. उभयपक्षांच्या विधीज्ञांनी वरीलप्रमाणे केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने वादपत्र व अर्ज नि.क्र. ०५ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वहिवाट दावा क्रमांक एम.सी.ए. ॲक्ट–५/बोरी/२३/२०१७–१८ मधील दिनांक २०.०५.२०२० रोजी झालेल्या निकालाबाबत वादीपक्षाने कोणताही उल्लेख केलेला नाही. पुढे असेही दिसून येते की, दिनांक १८.११.२०२२ रोजी उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी पारित केलेल्या आदेशाबाबत देखील वादी पक्षाने वादपत्रात किंवा अर्ज नि.क्र. ०५ मध्ये त्याचा उल्लेख केलेला नाही. निश्चितच वादी पक्षाने वरीलप्रमाणे झालेल्या निकाल व आदेशाबाबतची माहिती न्यायालयापासून लपवलेली आहे. उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी दिनांक १८.११.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता तहसीलदार मेहकर यांनी केलेल्या स्थळ निरीक्षण पंचनामा व दिलेल्या अहवालाच्या आधारे आदेश पारित केलेला आहे. पुढे दिनांक ३०.०८.२०२२ रोजी तहसीलदार मेहकर यांनी दिलेला अहवाल व त्यासोबत पंचनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादग्रस्त नालीचा नैसर्गिक प्रवाह हा गटक्रमांक १९५ च्या उत्तर धु–याने असून सदरची नाली वादींनी बंद करुन त्याच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदललेला आहे. त्यामुळे लगतच्या कास्तकारांच्या जमिनीत पाणी शिरुन त्यांच्या पिकाचे नुकसान होत आहे. वरील परिस्थिती लक्षात घेता उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक १८.११.२०२२ रोजी पुढील कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार मेहकर यांना दिलेले आहेत. निश्चितच मामलतदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ अनुसार झालेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार

तहसीलदार मेहकर यांना प्राप्त आहे. सबब, वर नमूद न्यायनिवाडयातील निष्कर्षाच्या अनुषंगाने वादींनी महत्वाच्या बाबी न्यायालयापासून लपविल्यामुळे त्यास तात्पुरता मनाई हुकूम मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. याउपरही, प्रतिवादींनी गटक्रमांक १९५ वरील वादींच्या मालकीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केल्याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा वादी पक्षाने न्यायालयात सादर केलेला नाही. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादींचे नुकसान होणार असल्याची परिस्थिती दिसून येत नाही. निश्चितच दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल प्रतिवादी यांच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ नामंजूर करण्यात आला.

२. सदरचा दावा आजपासून चार (०४) महिन्याच्या आत निकाली काढणे कामी उभयपक्षांनी आपापला तोंडी व कागदोपत्री पुरावा नेमलेल्या तारखेस सादर करावा.

३. खर्चाबाबत हुकूम नाही.

SHAIKH ABDULKARIM A

Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2023.03.29 11:35:07 +0530

(अ.अ.शेख)

दिनांकः–२८/०३/२०२३. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
मेहकर.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 28.03.2023
Date of Uploading : 29.03.2023